क्र.साप्रवि/रवका/गणवेष/न.क्र.७८१/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
**मुंबई - ४०० ०१९.**

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. २८९ दिनांक २१ / ०४ / २०१०

विषय : दक्षता संवर्गातील अधिकाऱ्यांच्या गणवेषाकरिता कापडाच्या रकमेच्या प्रतिपुर्तीमध्ये वाढ करणेबाबत.

संदर्भ : सर्वसाधारण आदेश क्र.१३० दिनांक ०५.०२.१९९३

......

सर्वसाधारण आदेश क्र.१३० दिनांक ०५.०२.१९९३ अनुसार दक्षता संवर्गातील अधिकाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या गणवेषाकरिता विकत घ्यावयाच्या कापडाच्या दरामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. आता व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (प्रकल्प), संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करून दक्षता संवर्गातील अधिकाऱ्यांच्या गणवेषाकरिता विकत घेण्यात येणाऱ्या कापडाच्या किंमतीच्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यास खालील तक्त्यातील रकाना क्र. ६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वाढ करण्यास मंजुरी प्रदान केली आहे.

| अ. क्र. | विवरण | कालावधी | एकूण कापड | सध्या देण्यात येणारी प्रतिपुर्तीची रक्कम | वाढीव दराने द्यावयाच्या प्रतिपूर्तीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | रेमंड कंपनीचे खाकी टेरीकॉटन कापड (रंग संकेत १७४ किंवा समतुल्य) | दोन वर्षातून एकदा | दोन अर्ध बाहीचे शर्टस् आणि दोन फुल पँटकरिता एकूण कापड ६.४० मीटर | रु. २३१/- प्रती मीटर दराने (सर्व करांसहित) | रु. ६००/- प्रती मीटर दराने एकूण रक्कम रु.३८४०/- (सर्व करांसहित) |

३. उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या वाढीव दराची अंमलबजावणी सन **<u>२०१०-११</u>** पासून करण्यात येईल. तथापि, सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित करण्यापुर्वी निकाली काढण्यात आलेली प्रतिपूर्तीची प्रकरणे पुनश्च: विचारात घेण्यात येऊ नयेत.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक म.रा.वि.वि.कं. मर्यादितच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

*( सु.य.पाटील )*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :
म.रा.वि.वि.कं.मर्यादितच्या विभागीय कार्यालय स्तरापर्यंत.

*K/Adm.Cir.- Uniform*